**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**

**आयुएसुओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

**ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com** **दूरध्वनी : (०२०) २५५३ ७६८८.**

**वेबसाईट : www.mcaer.org** **फॅक्स : (०२०) २५५३ ३७६४.**

संदर्भः- (१) कृषी परिषदेच्या ८२ व्या बैठकीतील विषय क्र.१९, ठराव क्र. १५/८२/२०१०
(२) कृषी परिषदेचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३१०/१०/८७१, दि.२३/३/२०१०
(३) कृषी परिषदेच्या ८३ व्या बैठकीतील विषय क्र.७, ठराव क्र.०३/८३/२०१०

--------------------

जा.क्रःमकृप/शिक्षण-१/८३ वी बैठक-७/११/९३ दिनांक : १३ जानेवारी ,२०११

## आ दे श

विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक स्वरूपाच्या कारणांमुळे एका कृषी विद्यापीठांतर्गत असलेल्या महाविद्यालयातून दुस-या कृषी विद्यापीठांतर्गत असणा-या महाविद्यालयामध्ये (आंतरविद्यापीठ) किंवा एकाच कृषी विद्यापीठांतर्गत इतर महाविद्यालयामध्ये (आंतरमहाविद्यालयीन) बदली होण्याकरिता संदर्भ क्र.२ येथील दि. २३/३/२०१० च्या परिपत्रकान्वये निकष, कालावधी, विहित कार्यपध्दती विशद करण्यात आलेली आहे. मात्र निकषांमधील अ.क्र. ८ येथे 'विद्यार्थ्याने वैद्यकीय कारणास्तव बदली मागितली असल्यास जिल्हा शल्य चिकित्सकाचे (Civil Surgeon) प्रमाणपत्र अनिवार्य असावे.' असे नमूद करण्यात आलेले आहे. वस्तुतः विद्यार्थ्यांच्या आंतरविद्यापीठीय / आंतरमहाविद्यालयीन बदल्या केवळ गुणवत्तेच्या आधारेच होत असल्याने अ.क्र. ८ येथील निकष वगळण्यात यावा, असा प्रस्ताव कृषी परिषदेच्या विचाराधीन होता.

कृषी परिषदेच्या ८३ व्या बैठकीमध्ये याप्रकरणी खालील ठराव पारीत करण्यात आला आहे.

<u>ठराव क्र. ०३/८३/२०१०</u>

**"चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवीपूर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या आंतरविद्यापीठीय किंवा आंतरमहाविद्यालयीन बदलीविषयक कृषी परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३१०/१०/८७१, दि.२३/३/२०१० सोबतच्या परिशिष्ट 'अ' येथील निकष क्र. ८- 'विद्यार्थ्याने वैद्यकीय कारणास्तव बदली मागितली असल्यास जिल्हा शल्य चिकित्सकाचे (Civil Surgeon) प्रमाणपत्र अनिवार्य असावे.' वगळण्यास कृषी परिषद मान्यता प्रदान करीत आहे."**

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ कलम १२ (१) आणि १२ (३) (जी) च्या अनुषंगाने सर्व संबंधितांना आदेशित करण्यात येते की, विद्यार्थ्यांकडून प्राप्त बदली अर्जांची छाननी करून संदर्भ

क्र. २ येथील दि.२३/३/२०१० च्या परिपत्रकामधील क्र. ८ चा निकष वगळून इतर निकष पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांच्या विनंती अर्जांबाबत नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

प्रस्तुत आदेशांची अंमलबजावणी तात्काळ प्रभावाने करण्यात यावी.

स्वाक्षरीत/-
**(गणेश ठाकूर)**
**सदस्य सचिव तथा**
**महासंचालक**

प्रतिलिपी-
(१) अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर
(२) अधिष्ठाता (कृषी), डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
(३) अधिष्ठाता (कृषी), मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
(४) अधिष्ठाता (कृषी), डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी.
(५) कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर
(६) कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
(७) कुलसचिव, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
(८) कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी.